CNR: MHSI05-000060-2018

**नियमीत दिवाणी मुकदमा नं. ०५/२०१८ मधील निशाण नं. ५ वरील आदेश**

प्रस्तुतच्या कामात आजरोजी प्रतिवादी हजर झाले आहेत. त्यांनी अर्ज देवून त्यांचे म्हणणे मांडण्यास मुदत मागितली आहे. या कामातील वादी यांनी त्यांना तुर्तातुर्त मनाई दयावी अशी मागणी केलेली आहे. दोन्ही पक्षकारांनी व्यक्तीशः ऐकले. प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसते की दोन्ही पक्षकारामध्ये दावा मिळकतीमधील वाटेवरुन वाद आहेत आणि त्या वादाबाबत महसुल दप्तरी बरीच प्रकरणे चाललेली आहेत. त्यामुळे दोन्ही पक्षकारांना ऐकण्याची समान संधी देणे योग्य राहाणार आहे. या दाव्याचे कामी निशाण ४/२२ येथे दिनांक १९/१/२०१८ रोजीचा लिखीत असलेले दावा मिळकती मधील वाटेबाबतचे छायाचित्र वादीने दाखल केलेले आहे. त्या छायाचित्राप्रमाणे आजरोजी दावा मिळकतीच्या येथे परिस्थिती आहे ही बाब दोन्हीही पक्षकारांना मान्य आहे. तुर्तातुर्त मनाई अर्जावर निकाल देण्यासाठी मला दोन्हीही पक्षकारांना ऐकावे लागेल. परंतु तोपर्यंत ज्याअर्थी सदर छायाचित्रा प्रमाणेची परिस्थिती दोन्हीही पक्षकारांना कबुल आहे त्याअर्थी तशी परिस्थिती प्रतिवादीने त्याचे म्हणणे मांडण्यापर्यंत दोन्हीही पक्षकारांनी ठेवावी असे मला वाटते. जेणेकरुन तुर्तातुर्त मनाई आदेश देण्यापर्यंत न्यायाचा समतोल दोन्ही बाजुंना ठेवता येईल.

२. या क्षणी ही गोष्ट स्पष्ट करण्यात येते की दोन्हीही पक्षकांराच्या अधिकारांबाबत या न्यायालयाने कोणतेही मत दिलेले नाही. म्हणजे वादी किंवा प्रतिवादी यांच्यापैकी कोणाची बाजू प्रथमदर्शतः योग्य आहे हे या आदेशाने ठरलेले नाही. तुर्तातुर्त मनाई अर्जावर म्हणणे येण्यापर्यंत उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे परिस्थिती ठेवल्यास दोन्हीही पक्षकारांचे हित साध्य होणार आहे. सबब मी खालील आदेश पारित करतो.

निशाण ४/२२ सोबत दिनांक १९/१/२०१८ रोजीच्या लिखित छायाचित्रांमध्ये दिसत असणा—या परिस्थिती मध्ये दोन्हीही पक्षकांरानी प्रतिवादीने त्याचे म्हणणे देण्यापर्यंत परिस्थिती ठेवायची आहे.

सही/—

दिनांक— ३०/१/२०१८

(विनायक द. पाटील)

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.